Vol 5 Issue 10 April 2016 ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**


Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


## Regional Editor

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University



**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.oldgrt.lbp.world**

ISSN: 2231-5063 Impact Factor : 3.4052(UIF) Volume - 5 | Issue - 10 | April - 2016

Golden Research Thoughts

GRT

# अनुवाद लेखन – एक प्रक्रिया

प्रा. डॉ. मनिषा यशवंतराव तावरे
मु. सा. काकडे महाविद्यालय, सोमेश्वरनगर, ता. बारामती, जि. पुणे.

**प्रस्तावना : –**

भाषांतर आणि अनुवाद या दोन्ही संज्ञा काही वेळा समानार्थी म्हणून वापरल्या जातात. पण दोन्हीमध्ये सुक्ष्मभेद असल्याचे जाणवते. भाषांतरामध्ये पहिल्या मजकुराचा शब्दशः अनुवाद करावा लागतो. तर अनुवादामध्ये अनुवादकाला स्वतःचे विचार, कल्पना यानुसार स्वर परिवर्तन करता येते. भाषांतर करताना कोणात्याही प्रकारची अर्थहानी होणार नाही याची काळजी घेतली जातो. चांगल्या अनुवादकाजवळ दोन्ही भाषांची उत्तम ज्ञान आणि आकलन कौशल्ये असायलाच हवीत. त्याचबरोबर सर्जनशीलता ही असावी –

भाषांतर ही पण अनुवादाचीच प्रक्रिया असल्याने त्यातही सारांश,, विस्तार, स्पष्टीकरण, गद्यपद्यरूपांतर इ. प्रकारचा समावेश होतो. मूळ भाषेतील साहित्य संस्कृतीचा साध्याभाषेत अनुवाद करणे म्हणजेच एका सांस्कृतिक संदर्भात रूजवण्यासारखेच असते.

**अनुवाद – अर्थ : –**

अनुवाद शब्दाची उत्पत्ती संस्कृतीमधील 'वद'या धातूपासून झालेली आहे. अनुवादाचा शाब्दिक अर्थ पुनःकथन म्हणजेच एखादी गोष्ट पुन्हा सांगणे असा होतो. एका भाषेतील विचार दुसऱ्याभाषेत प्रकट करण्याची अनुवाद ही एक रूपांतरण प्रक्रिया आहे. अनुवादामध्ये मजकुराचे जसेच्या तसे भाषांतरण अपेक्षित असते. असे असले तरी अर्थ लक्षात घेऊन केलेले भाषांतर म्हणजेच अनुवाद असे म्हणता येईल.

थोडक्यात कोणत्याही भाषेत लिखित वा मौखिक स्वरूपात असणारा मजकूर दुसऱ्या भाषेत सार्थक परिस्थितीत परिवर्तीत करणे याला अनुवाद म्हणतात.



**अनुवाद – स्वरूप : –**

अनुवाद हे एक शिल्प आहे. त्यामध्ये एका भाषेतील लिखित संदेशाच्या जागी दुसऱ्या भाषेतील संदेश मांडण्याचा प्रयत्न केला जातो. तसेच एका भाषेत व्यक्त केलेले विचार भाव दुसऱ्या भाषेत समान व सहज रूपाने मांडण्याचा प्रयत्न केला जातो. अनुवादात मूळ भाषेतील विचार अन्य भाषेत परिवर्तित करणे अपेक्षित असते. हे कार्य अतिशय कठिण व गुंतागुंतीचे आहे. कारण प्रत्येक भाषेचे स्वतंत्र असे स्वरूप असते. यामध्ये जो अनुवादक सर्जनशील त्याचा अनुवाद उच्च प्रतीचा होतो. त्यामुळे अनुवाद करणे हे एक सर्जनशीलतेचाच भाग आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

प्रत्येक भाषेतील ध्वनी, रूप, वाक्य आणि अर्थमूलक वैशिष्टये भिन्न असतात. त्यानुसार अनुवादात परिवर्तनाला महत्व आहे. अनुवादात दोन भाषा असणे गरजेचे असते. ज्या भाषेतील विचार अनुवादित करायचे आहे ती मूळ भाषा आणि ज्या भाषेत तिचे परिवर्तन रूपांतर केले जाते ती लक्ष्य भाषा होय.

अनुवाद ही वैश्विक स्तरावर विचारांचे आदानप्रदान करण्याची प्रक्रिया आहे. म्हणूनच विसाव्या शतकात 'अनुवाद युग' म्हटले जाऊ लागले. अनुवाद करणे ही एक कला आहे. हा केवळ व्यवसाय अथवा कार्य नाही तर ते एक व्यवसायिक कौशल्याही आहे. एका भाषेत सांगितलेली बाब प्रामाणिकपणे व सार्थकतेने दुसऱ्याभाषेत व्यक्त करताना अनुवादकाच्या स्वाभाविक अविष्कारालाही चालना मिळते. तो अनुवाद तेव्हाच सफल होईल जेव्हा 'तो अनूवाद आहे हे वाचकाच्या लक्षात येणार नाही' म्हणजेच इतका समर्पक, योग्य व अचूक शब्दात तो मजकूर अनुवादित

केलेला असावा. अनुवादामध्ये ज्या दोन भाषा वावरत असतात त्या भाषेच्या समाजाची संस्कृती, प्रचलित संकेतांचे पालन तंतोतंत करायला हवे. त्या समाजाची आवड निवड, जीवनाशी संबंधित गोष्टी त्याने समजून घ्यायला हव्यात. असंख्य वाचकांना तृप्त करण्याचे महत्वाचे काम अनुवादकाला करावे लागते. अनुवादकाच्या कार्यात केवळ विषय ज्ञान असून चालत नाही, तर त्या विषयातील बारकावे, पारिभाषिक शब्द यांचीही जाण असणे अंत्यावश्यक असते. भाषांतर करताना शब्दांचे भान ठेवावे लागते. अन्यथा अर्थाचा अनर्थ होण्याची शक्यता नाकारता येत नाही व त्यामुळे अनेक संकंटाना सामोरे जावे लागते.

अनुवादामध्ये वाचकांबरोबरच सभोवतालच्या परिस्थिती वेळ सृष्टीसौंदर्य यांचे ही भान ठेवावे लागते. विश्वातील एकात्मकतेसाठी अनुवादकाची महत्त्वाची भूमिका असते. कारण जर विचारांची देवाणघेवाण झाली. तरच अंग अनुवादाने व्यापलेली दिसतात. अनुवादाचे कार्यक्षेत्र विस्तृत झाल्याचे दिसते.

### *अनुवाद आणि व्याकरण : –*

अनुवाद ही यांत्रिक प्रक्रिया नाही तर यामध्ये भावनेलाही प्राधान्य दिले जाते. या प्रक्रियेत एका बाजूला मूळे लेखक असतो तर दुसऱ्याबाजूला अनुवादक व्यक्ती असते. या दोहोंमध्ये अनुवाद प्रक्रिया चालते. वि.स. खांडेकरांच्या 'ययाति' या कांदबरीचे दर भाषांमध्ये केलेले अनुवाद व नरेंद्र जाधव यांच्या 'मी आणि माझा बाप' या पुस्तकाचे 17 भाषेमध्ये झालेला अनुवाद ही अनुवादाची उत्तम उदा. आहेत. त्याचबरोबर 'नीलची शाळा, समरहिल' 'वाइज ॲन्ड अदरवाइज', 'नॉट विदाऊट आयडॉटर' अशा कितीतरी पुस्तकांचे उत्तम अनुवाद आलेले आपल्याला ज्ञात आहेत. या प्रक्रियेत मूळ लिखाणाचा अर्थ लावणे लिखाणातील तथ्य समजून घेणे, लिखाणातील अर्थानुरूप योग्य शब्दाप्रमाणे समजून घेण व लिखाणाची स्वतःच्या शब्दात मांडणी करणे या गोष्टी अतिशय महत्त्वाच्या असतात. अशा बाबींचा उहापोह करीत असताना व्याकरणाचाही भाग अत्यंत महत्तवाचा मानला जातो. मजकुराच्या व्याकरण शुद्धतेकडे लक्ष द्यावे लागते. अनुवाद करताना बऱ्याचदा त्यामध्ये पारिभाषिक शब्द, कठीण शब्द येतात. त्यांचे अर्थ शोधण्यासाठी आपल्या संग्रही विविध शब्दकोश असणे गरजेचे असते. त्यामुळे कधी कधी अनुवादात अडचणी येण्याची शक्यता असते. त्यासाठी अनुवादकाने दोन्ही भाषेची व्याकरणिक व्यवस्था लक्षात घेणे गरजेचे असते. लिंगव्यवस्था ही भाषेनुसार बदलत असते. त्यासाठी अनुवादकाने दोन्ही भाषेची व्याकरणिक व्यवस्था लक्षात घेणे गरजेचे असते. उदा. मराठी भाषेने 'नदी' ही स्त्रीलिंगी मानली व डोह यांचा विचार करताना स्त्री आणि पुरुष या स्वरूपातच करतो. तसेच मराठी भाषेत सख्ख्या भावंडाखेरीज इतर चार प्रकारची भावंडे मानली जातात. त्यासाठी चुनत, आते, मामे, मावस असे शब्द आहेत. परंतु इंग्रजीत मात्र 'Cousin' हा एकच शब्दप्रयोग केला जातो.

अनुवाद करताना काहीवेळा शब्दांची व्याप्ती कमी होते. तर काही वेळा वाढते. अनुवादकाने अनुवाद करताना मूळ भाषेशी प्रामाणिक रहावे. म्हणजेच मूळ भाषेचा अर्थ बदलणार नाही याची खबरदारी घ्यावी.

ललितसाहित्याचे अनुवाद करणे तसे आव्हानात्मक असते. कादंबरी, नाटक, कविता इ. वाङमय प्रकारात लेखकाने स्वतः कमावलेली भाषा असते. कमी कालावधीत मोठा अर्थ सांगणारी टोकदार, ललितपूर्ण भाषा इथे अपेक्षित असते. ग्रंथातील भाषेला निवेदन, वर्णन, संवाद कथानकाचा ओघ, पात्राची रूपरेषा इ. गोष्टीही कराव्या लागतात.

ग्रामीण, दलित, आदिवासी आणि प्रादेशिक साहित्यात महाराष्ट्रातील निरनिराळया बोलींचा उपयोग केलेला असतो. त्यांचा अनुवाद करणे कठीण असते. अशावेळी प्रमाणभाषेचा आधार घ्यावा लागतो.

### *अनुवावदाचे उपयोजन : –*

अनुवादकाची निष्ठा हा महत्त्वाचा प्रश्न आहे. अनुवादकाच्या सर्जक प्रतिमेचा हा प्रश्न आहे. मूळ लेखनाशी निष्ठा आपल्या भाषिक संस्कृतीशी व वाचकांशी निष्ठा ठेवाव्या लागतात. अनुवादकाला अनुवादित रचना मूळ भाषेतील कृतीसारखीच आहे असे वाटणे ही अनुवादकाची कसोटी आहे. ललितसाहित्याच्या बाबतीत हे काम कठीण आहे. प्रत्येक साहित्यप्रकारचा आत्मा कशात आहे हे शोधणे आणि तो ज्या शैलीत अभिव्यक्त केला गेला आहे व तो जसाच्या तसा अनुवादित करणे ही दुरापास्त गोष्ट आहे.

अनुवादाचे उपयोजनासंदर्भात फ्रेंच मानवतावादी विचारवंत डोलेट यांनी इ.स. 1500 मध्ये मूलभूत आणि सूत्रबद्ध विचार मांडले व पुढील पाच महत्त्वाची तत्वे सांगितली.

1.भाषांतरकारने मुळातील अर्थ व आाशय नीट समजावून घेणे आवश्यक आहे. मुळातील संदिग्ध अर्थही तो योग्य ते स्वातंत्र्य घेऊन स्पष्ट करू शकतो.

2.मूळ भाषेचे व लक्ष्य भाषेचे उत्तम शान भाषांतरकारापाशी असायला हवे.

3.भाषांतरकारने शब्दशः भाषांतर करणे टाळावे.

4.रोजच्या वापरातील शब्दप्रयोग त्याने भाषांतरामध्ये योजवावेत.

5.भाषांतरकाने शब्दाची निवड चोखंदळपणे करून योग्य तो परिणाम साधण्याच्या दृष्टिने मांडणी करावी.

### *समारोप : –*

अनुवाद ही नवनिर्माणक्षम कला आहे. अनुवाद हे शास्त्र आणि कलाही आहे. ललितसाहित्याचा अनुवाद करताना अनुवादकाला अधिक सर्जन व्हावे लागते. अनुवादाचे केलेल्या ज्ञानावर अवलंबून असते. अनुवाद म्हणजे एका सांस्कृतिक संदर्भातील अनुभवाला अर्धामाला दुसऱ्या सांस्कृतिक संदर्भात रूजविण्यासारखेच आहे.

### *संदर्भ : –*

1. भाषांतर मीमांसा संपादन : डॉ. कल्याण काळे, डॉ. अंजली सोमण, प्रतिमा प्रकाशन, पुणे, 1997.
2. भाषांतर मीमांसा 'भाषांतर संकल्पनेचा विकास' या अंजली सोमण यांच्या लेखातून उद्धृत.
3. भाषांतर मीमांसा कन्नड मराठी अनुवाद : एक अनुभव डॉ. उमा कुलकर्णी.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.www.oldgrt.lbp.world